**Warkem®** WA301

# सॉईल ऑरगेनिक सप्लिमेंट

## (सेंद्रिय माती पुरवणी)

मातीत सेंद्रिय कर्ब
जितका जास्त
तितके तिच्यापासून
उत्पादन जास्त.




**वारकेम् बायोटेक प्रा. लि.**


रजि. कार्यालय : ३३, वधानी इंडस्ट्रियल इस्टेट, एल.बी.एस्. मार्ग, मुंबई - ४०० ०८६, भारत.
दूरध्वनी क्र.: ९१-२२-२५०००७४६, ग्राहक क्र.: ९१-२२-२५०००६५३, ९३२१२६९७१५
• ई-मेल : info@warkembiotech.com • वेबसाईट : www.warkembioagri.com

9423060326
9823741473
9321269715
9320370840

Warkem®

# सॉईल ऑरगेनिक सप्लिमेंट

## (सेंद्रिय माती पुरवणी)

WA301

**वारकेम् बायोटेक** निर्मित सॉईल ऑरगेनिक सप्लिमेंट (WA301), हे एक दर्जेदार भूसुधारक असून त्यात सेंद्रिय कर्बाबरोबर सेंद्रिय स्वरुपातील नत्र, स्फुरद आणि पालाश (NPK) ही बृहत्पोषकतत्वे पण उपलब्ध आहेत.

### सेंद्रिय कर्ब आणि त्याचे जमिनीतील महत्त्व :

- ☞ जमिनीचे आरोग्य जमिनीतील खनिजपदार्थ, हवा, पाणी आणि जमिनीत उपलब्ध असणाऱ्या सेंद्रिय पदार्थांवर अवलंबून असते.
- ☞ त्यातील हवा, पाणी आणि जमिनीतील खनिजपदार्थ निसर्गात मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. पण सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण सातत्याने कमी जास्त होत असते.
- ☞ सेंद्रिय पदार्थांच्या प्रमाणात फरक पडल्याने जमिनीत त्यांचे विघटन करणाऱ्या जिवाणूंच्या संख्येतही फरक पडतो आणि पर्यायाने जमिनीचे आरोग्य बिघडते.
- ☞ सेंद्रिय कर्ब हे जमिनीतील जिवाणूंचे खाद्य असून ते सातत्याने भूरासायनिक चक्रात समाविष्ट करत राहणे हे अत्यंत गरजेचे आहे.
- ☞ एक पिक पद्धती ज्यामध्ये एकाच प्रकारची पीके सतत घेतली जातात.
- ☞ हयात रासायनिक खतांचा तथा किटकनाशकांचा तथा बुरशीनाशकांचा तथा तणनाशकांचा **असंतुलित, अमर्यादित आणि अयोग्य वापर झाल्याने जमिनीतील सेंद्रिय कर्ब ऱ्हास होत आहे.**
- ☞ म्हणूनच जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविण्यासाठी तसेच पर्यायाने **जमिनीतील जिवाणूंच्या संख्येत वृद्धी करण्यासाठी वारकेम् बायोटेकने सॉईल ऑरगेनिक सप्लिमेंटची निर्मिती केली आहे.**

### सॉईल ऑरगेनिक सप्लिमेंट वापरण्याचे कार्य :

१) सॉईल ऑरगेनिक सप्लिमेंट भूसुधारकाचा सामू उदासीन (Neutral) (सामू-७.०) पातळीच्या जवळ आहे. त्यामुळे पिकांवर तथा जमिनीवर कुठल्याही प्रकारचा दुष्परिणाम होत नाही.

२) सॉईल ऑरगेनिक सप्लीमेंट हा नैसर्गिक सेंद्रिय कर्बाचा सर्वोत्तम स्तोत्र आहे आणि त्याच्या वापराने जमिनीतील सेंद्रिय कर्बाची गरज पुरविण्यास मदत होते आणि पर्यायाने जिवाणूंच्या संख्येत वृद्धी होते.

३) सॉईल ऑरगेनिक सप्लिमेंट वापरल्याने पिकांच्या पांढऱ्या मुळांची जोमदार वाढ होते.

४) सॉईल ऑरगेनिक सप्लिमेंट च्या वापराने जमिनीतील हयुमसचे प्रमाण वाढण्यास मदत होते, त्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो आणि जमिन सुपिक बनविण्यास मदत होते.

५) सॉईल ऑरगेनिक सप्लिमेंट मधील सेंद्रिय नत्र, स्फुरद आणि पालाशामुळे अन्नधान्य, भाजीपाला, फळे इ. पिकांची गुणवत्ता (उदा. चव, रंग, वजन) तथा त्यांची टिकवणक्षमता वाढविण्यास मदत होते.

### मात्रा : ५ किलो प्रति एकर.

**सूचना :** हया उत्पादनाची साठवणूक उष्णतेपासून दूर, थंड आणि कोरडया जागेत करावी. वापर झाल्यानंतर पिशवी योग्यरित्या नष्ट करावी. रिकाम्या पिशवीचा वापर खाद्यपदार्थ अथवा पाणी साठविण्यासाठी करु नये. हया उत्पादनाचा आपल्या त्वचेशी होणारा संपर्क टाळा. हे उत्पादन लहान मुलांपासून दूर ठेवावे.

**हमी :** नैसर्गिक आपत्ती अथवा पर्यावणात होणाऱ्या अचानक बदलावाने पिकांस होणाऱ्या नुकसानीस कंपनी जबाबदार नाही.

वारकेम बायोटेक प्रा. लि.

अधिकृत विक्रेता :

Literature Code : TL526-01/SOS Lit_1218